# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

## ६ जुन ते ७ जून २०२१ पर्यंतचा पावसाळी परिस्थितीचा अहवाल

## (सकाळी ८ ते ८, २४ तास)

**१. पाऊसः-**

| हवामान केंद्र | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ०७.०६.२०२१ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०२१ पावसाची टक्केवारी | ०७.०६.२०२० पर्यंतचा एकुण पाऊस (मिमी) | २०२० पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | ९.४ | ३८.६ | २२९५ | १.६८% | २०५.७ | ८.९७% |
| सांताक्रूझ | १७.२ | ११५.३ | २७०४ | ४.२६% | १८५.७ | ६.९६% |

**२. मनपाच्या स्वयंचलित पर्जन्यमापन यंत्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस**

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ७ जून २०२१ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकूण सरासरी पाऊस (२४९९) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | १६.०७ | ८९.७२ | ४.११% | २.१४% |
| पूर्व उपनगरे | ७.९७ | ४३.१९ | १.४१% | |
| पश्चिम उपनगरे | ८.२७ | २६.२० | | |

**३. तापमानः**

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | ३२.६ | २४.५ |
| सांताक्रुझ | ३३.५ | २४.२ |

**४. समुद्राची भरती:**

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ०७.०६.२०२१ | स. १०:३५ | ३.८७ मीटर | ०७.०६.२०२१ | सायं. ४:१५ | २.०४ मीटर |
| ०७.०६.२०२१ | रात्रौ १०:१५ | ३.५३ मीटर | ०८.०६.२०२१ | पहाटे ४:२७ | १.०० मीटर |
| ०८.०६.२०२१ | सकाळी ११:०८ | ४.०३. मीटर | ०८.०६.२०२१ | सायं. ४:५७ | २.०२ मीटर |

५. **हवामान अंदाज**: कुलाबा वेधशाळेने पुढिल २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार आकाश सर्वसाधारणतः ढगाळ रहाण्याची शक्यता असून गडगडाटासह तुरळक / मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

६. **पाणी साचणेः निरंक**

७. **घर पडण्याच्या तक्रारीः-** पूर्व उपनगरात १ व पश्चिम उपनगरात २ अशा एकूण ३ ठिकाणी घराचा / भिंतीचा किरकोळ भाग पडल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या.

पश्चिम उपनगरेः दिनांक ०७.०६.२०२१ रोजी मध्यरात्री १:४५ वा. अग्निशमन दलाकडून प्राप्त माहितीनुसार मेहेक शॉप, खेरवाडी रोड, बांद्रा (पू) येथे रझाक चाळ या तळमजला अधिक तीन माळ्याच्या इमारतीची भिंत बाजूला असलेल्या तळमजला अधिक दोन असे बांधकाम असलेल्या चाळीवर पडली. आ.व्य. विभागाच्या सुनिश्चित कार्यपध्दतीनुसार घटनास्थळी मदतकार्य रवाना करण्यात आले. सदर घटनेत अग्निशमन दलामार्फत ११ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात आले. तर ६ जणांना अग्निशमन दल पोहोचण्यापूर्वी नागरीकांनी बाहेर काढून बांद्रा भाभा रुग्णालय व व्हि एन देसाई रुग्णालय येथे पाठवले. रुग्णालयांतून प्राप्त माहितीनुसार या घटनेत १ व्यक्ती मृत झाली असून १ जखमी महिला पुढील उपचाराकरिता केईएम रुग्णालयात पाठविण्यात आली आहे तर उर्वरित ४ लोकांना उपचार करुन घरी पाठविण्यात आले आहे.

**व्हि एन देसाई रुग्णालयातून प्राप्त माहितीः-**

१. श्री. रियाझ अहमद, वय २८ वर्षे, रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत

२. श्री. नुरुल हक हैदर अली सय्यद, वय २१ वर्षे, उपचार करुन सोडले

३. श्री. नुर मुद्दीन शेख, वय ४० वर्षे, उपचार करुन सोडले.

**बांद्रा भाभा रुग्णालयातून प्राप्त माहितीः-**

४. श्रीम लता मोहन खोत, वय ४८ वर्षे, पुढील उपचाराकरिता केईएम रुग्णालयात पाठवले

५. श्री. सलमान अतिक खान, वय २४ वर्षे, उपचार करुन सोडले

६. श्री. राहुल मोहन खोत, वय २२ वर्षे, उपचार करुन सोडले.

८. **झाडे पडण्याच्या तक्रारीः-** शहरात २, पूर्व उपनगरात ३ व पश्चिम उपनगरात ४ अशा एकूण ९ ठिकाणी झाडे /फांद्या पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. झाडे /फांद्या तोडण्याचे व उचलण्याचे काम सुरु आहे. उपरोक्त घटनांमध्ये कुणीही जखमी नाही.

९. **शॉर्टसर्कि्टः-** शहरात ४ आणि पूर्व उपनगरात १ अशा एकूण ५ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या घटना घडल्या. कुणीही जखमी नाही. संबंधित विद्युत पुरवठा यंत्रणांना कळवून मदतकार्य रवाना करण्यात आले.

१०. **दरड कोसळणेः- निरंक**

११. **वाहतूक व्यवस्थाः- (आज सकाळी ९ वा. प्राप्त माहितीनुसार)**

मुंबई शहर व उपनगरातील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

१२. **विशेष माहितीः** निरंक

************